# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,
## प्राथमिक शिक्षण विभाग

**प्रस्तावना**

**विषयः- अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क) ९०,३१९ कलम अन्वये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सेवेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपूर शहर महानगरालिका कार्यक्षेत्रातील मनपा शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता एकसुत्रता राहण्याकरीता तसेच विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करण्यासाठी प्रगती पत्रक, संचयी नोंदवही, मुल्यमापन नोदंवही इ. छपाई करण्यासाठी आर्थिक तरतुद करणे हे मा. आयुक्त सो., यांचे अधिकार आहे. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| लेखा शिर्षकाचे नांव | सन २०२२-२०२३ करीता करणेत आलेली तरतूद | सन २०२२-२०२३ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | दि.६/९/२०२२ पर्यंत शिल्लक |
|---|---|---|---|
| शिक्षण विभाग | ५.०० लक्ष | ४.४७ लक्ष | रु.०.५३ |

सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये शिक्षण विभाग या लेखाशिर्षकामध्ये निधीची कमतरता आहे. त्या लेखाशिर्षका मधील मंजूर प्रस्ताव हे निधी अभावी प्रलंबित आहे. सदर लेखाशिर्षामध्ये खालील कामाचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| शाळेतील विद्यार्थ्यांकरीता प्रगती पत्रक (सर्व माध्यम) | रु.१,९९,६००/- | |
| शाळेतील विद्यार्थ्यांकरीता मुल्यमापन नोदंवही (सर्व माध्यम) | रु.१,९९,६०६/- | |
| शाळेतील विद्यार्थ्यांकरीता संचयी नोंदवही,शाळा प्रवेश दाखला, शाळा सोडल्याचा दाखला व इतर छपाई (सर्व माध्यम) | रु.१,२३,०१०/- | |
| एकूण | रु.५,२२,२१६/- | |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२ कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षखाली रक्कम खर्च झाले नाही. व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत ज्यादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करुन भागविता येऊ शकतो. व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो., यांचे आहेत.

शिक्षण विभाग या लेखाशिर्षा खालील सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षा करीता ५.०० लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. मात्र सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील देयक रुपये ४.४७ लक्ष हे सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात खर्च झालेला आहे. शाळेच्या इमारती बांधणे या लेखाशिर्ष अंतर्गत सन २०२२-२०२३ करीता १००.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी आज रोजीपर्यंत सदर लेखाशिर्षा मधून रु.५०.०० लक्ष खर्च झाले असून रु.५०.०० लक्ष शिल्लक आहेत. तरी शाळेच्या इमारती बांधणे या लेखाशिर्ष मधून रु.५.०० लक्ष रुपयाचे शिक्षण विभाग या लेखाशिर्षा मध्ये पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमुना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सो., यांनी दिनांक ०८/१२/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ६२ **दिनांक** - २२/१२/२०२२

भिवंडी निजामपूर शहर महानगरालिका कार्यक्षेत्रातील मनपा शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरीता एकसुत्रता राहण्याकरीता तसेच विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करण्यासाठी प्रगती पत्रक, संचयी नोंदवही, मुल्यमापन नोदंवही कार्यालयीन छपाई इ. करणे कामी प्रशासकिय मंजुरी प्रदान करणेत आलेली आहे. मात्र निधी अभावी पुढील कार्यवाही करणेत आलेली नाही. सदर लेखाशिर्षा मध्ये बांधकाम विभागाकडील शाळेच्या इमारती बांधणे या लेखाशिर्ष मधून नमुना क्र.१० नियम ३० (३) रु.५.०० लक्ष रुपयाचे शिक्षण विभाग या लेखाशिर्षा मध्ये पुनर्विनियोजनाने वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग २)नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये मला प्राप्त झालेला अधिकारानुसार मी श्री.विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.श.महानगरपालिका,भिवंडी**